# आमराई

*ईशा सरदेसाई यांच्याद्वारे पुनर्लिखित*

उन्हाळ्याचे दिवस होते आणि आमराईतील हवेला मधुर सुवास येत होता. आंब्याच्या झाडांच्या अनेक रांगा त्या आमराईत होत्या; नजर पोहोचेल तिथपर्यंत झाडेच झाडे होती आणि प्रत्येक झाड भरपूर फळांनी लगडले होते. आंब्यांची साले आता लालसर केशरी रंगाची झाली होती आणि, त्याचा अर्थ काय हे जाणणाऱ्या जाणकार लोकांना ती असा संदेश देत होती की, होय, आंबे आता आस्वाद घेण्यासाठी तयार झाले आहेत.

ती आमराई एका दयाळू आणि उदार अंतःकरणाच्या महिलेची होती, जिच्या कुटुंबाकडे त्या आमराईची मालकी होती आणि पिढ्यानपिढ्या तिच्या कुटुंबाने त्या आमराईची देखभाल केली होती. दरवर्षी, आंबे पूर्ण पिकल्यावर, ती महिला एका खास निवडलेल्या दिवशी ती आमराई गावातील लोकांसाठी खुली करत असे. कोणीही आणि प्रत्येकजण — युवा असो किंवा वृद्ध, श्रीमंत असो किंवा गरीब — प्रत्येकाला येण्यासाठी आमंत्रित केले जाई.

अट फक्त एवढीच होती की, आमराई त्या दिवशी फक्त तीन तासांसाठीच खुली राहिल. या तीन तासांमध्ये लोक त्यांना हवे तितके आंबे तोडू शकतील आणि खाऊ शकतील — अगदी विनामूल्य — शिवाय आपल्याबरोबर घरी घेऊन जाण्यासाठीही, ते आंबे टोपल्यातून भरून घेऊ शकतील. एकदा का तीन तास उलटले की, मग मात्र त्यांना तिथून निघून जावे लागेल.

हा विशेष दिवस पुन्हा एकदा उगवला. सौम्य आणि तेजस्वी सूर्यप्रकाश पसरला होता, जो झाडांमधून आरपार जात जमिनीवर विभिन्न आकारांच्या सावल्या तयार करत होता. आकाश निरभ्र, निळसर होते. आणि ताज्या पिकलेल्या फळांचा मधुर सुवास, मनाला मोहवत हवेत दरवळत होता. आमराईच्या फाटका बाहेर आता रांग लागायला सुरुवात झाली होती.

प्रसन्नतेने हसत, मालकिणबाईने तिथे जमलेल्या सर्व लोकांचे स्वागत केले.

“तुम्हा सर्वांचे स्वागत!” ती म्हणाली. तिने तिथे उभ्या असलेल्या काही मुलांवर नजर टाकली, गेटमधून आतल्या बाजूला निरखून पाहणाऱ्या त्या मुलांनी आपल्या बोटांनी गेटच्या लोखंडी गजांना आवळून धरले होते. “तुम्ही आंबे खाण्यासाठी तयार आहात का?”

मुलांनी विस्फारल्या नजरेने तिच्याकडे पाहत माना डोलावल्या, त्यांचे डोळे आशेने भरलेले होते. “तर मग, आता वाट कशाची पाहता आहात. आत या!” ती म्हणाली.

असे म्हणून, तिने गेट उघडले आणि सर्वांना आत येण्यास खुणावले. तिथे आरडाओरडा आणि आनंदाने किंचाळणे सुरू झाले, सुरुवातीला मुलांनी पुढे धाव घेतली, त्यांच्या पाठोपाठच त्यांच्या पालकांनी व इतर वयस्कांनी धावायला सुरुवात केली. लवकरच संपूर्ण आमराईत लोक स्वैरपणे भटकू लागले. त्या झाडांकडे बोटांनी निर्देश करू लागले, ज्यांच्यावर सर्वात जास्त रसदार दिसणारी फळे लगडली होती. काही लोक झाडांच्या सावलीत बसून, बक्षिसादाखल त्यांना मिळालेल्या फळांच्या फोडी कापून खाऊ लागले, आंब्याचा गर अमृतासमान मधुर होता, आंब्यांच्या रसाचे ओघळ त्यांच्या हातांवरून ओघळू लागले. सर्वांसाठी, तो जणू अत्याधिक आनंदाचा काळ होता.

प्रत्येकजण, फक्त एक व्यक्ती सोडून. गेटजवळ एक माणूस उभा होता ज्याचा एक पाय आमराईच्या आत होता तर दुसरा आमराईच्या बाहेर. आत जे काही चालू होते त्याचे निरीक्षण, तो कपाळावर आठ्या घालून करत होता — सर्वांचे बागडणे, खाणे, हसणे.

त्या फळझाडांच्या बागेच्या मालकिणीने त्या माणसाला जेव्हा पाहिले आणि तो संभ्रमात पडलेला दिसतो आहे हे जेव्हा तिच्या लक्षात आले, तेव्हा ती त्याच्याकडे गेली.

“श्रीमान,” ती म्हणाली. “तुम्हाला आत येऊन थोडे आंबे खायचे आहेत का? तसे बघायला गेले तर मी स्वतःच माझ्या बागेतील आंब्यांची स्तुती करते आहे, पण खरोखरच ते अतिशय स्वादिष्ट आहेत.”

उत्तर देण्याआधी तो माणूस क्षणभर थांबला; त्याच्या कपाळावरील आठ्या आणखीनच गहिऱ्या झाल्या. “मी इथे आलो तेव्हा माझाही तोच विचार होता,” तो म्हणाला. “मी ऐकले होते की, इथे आंबे आहेत आणि सर्वजण ते खाण्यासाठी आमंत्रित आहेत.”

“होय, ते खरे आहे,” मालकिण म्हणाली. तिने स्मितहास्य केले आणि त्याला प्रोत्साहित करत ती म्हणाली, “मग तुम्ही आत का येत नाही आहात?”

“अ- अ- ऽऽऽ. . .” तो माणूस म्हणाला. बोलताना तो चाचरत होता.

“काय झाले?” मालकिण म्हणाली.

“मला — मला नाही माहित,” माणसाने प्रत्युत्तर दिले. एकाएकी त्याच्या तोंडातून शब्द बाहेर पडू लागले. “मला वाटले होते की, मला खरोखरच आंबे खायचे आहेत. म्हणून मी तुमच्या आमराईपर्यंत चालत आलो. पण आता मी इथवर पोहोचल्यावर, ही सर्व आंब्याची झाडे, आंबे आणि माणसे पाहता — आणि सर्वकाही इतके मनोहारी आहे हे पाहता — मी दुविधेत सापडलो आहे.”

“कोणती दुविधा?” मालकिणीने विचारले.

त्या माणसाने पुन्हा एकदा आजूबाजूचे बारकाईने निरीक्षण केले, प्रत्येक झाडाकडे, प्रत्येक आंब्याकडे, धरणीमातेकडून प्राप्त झालेल्या या प्रचुरतेचा आस्वाद घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडे तो जसजसा पहात गेला, तसतसे त्याचे डोळे विस्फारत गेले. “म्हणजे मला असे म्हणायचे आहे की, हे सर्व खरे कसे असू शकते?” अखेरीस आश्चर्य व्यक्त करीत तो म्हणाला. “काय, हे सर्व आंबे आम्ही खाऊ शकतो? आणि तेदेखील इतके चांगले आंबे? नाही, नाही, हे खरे असूच शकत नाही. मला मात्र यात नक्कीच काहीतरी गडबड वाटते आहे.”

“श्रीमान, यात कुठलीही गडबड वगैरे नाही, ” मालकिण म्हणाली. “तुम्ही आत येऊन थोडे आंबे खाल्लेत तर मला खूप आनंद होईल. तुम्हाला फक्त हे लक्षात ठेवायचे आहे की, वेळ मर्यादित आहे. ही आमराई मी दिवसभरासाठी खुली ठेवू शकत नाही. म्हणून तुम्ही आता आत यायलाच हवे.”

ती काय म्हणते आहे याकडे त्या माणसाचे जेमतेमच लक्ष होते. तो स्वतःच्या विचारांच्या आणि भावनांच्या गर्तेत अडकत चालला होता.

“खरे सांगायचे तर,” तो म्हणाला. “मला हेदेखील कळत नाही की, मी इथे असायला हवे की नको. घरी मला कितीतरी कामे आहेत आणि मी इथे आलो आहे, आंबे खाण्याच्या तयारीने!”

“श्रीमान —” मालकिण मध्येच अडवत म्हणाली, पण आता तर तो माणूस तिच्याकडे पाहतही नव्हता. त्याची नजर जमिनीवर एकाग्र झाली होती; तो अत्यंत सफाईदारपणे गवताशी संभाषण करत होता.

“इथे बसून राहून आंबे खाणारा मी कोण?” तो म्हणाला. “मी  ते खाण्यायोग्य बनण्यासाठी काय केले आहे? ते आंबे नक्कीच माझ्याहून अधिक सुयोग्य लोकांसाठी आहेत.”

“आंबे सर्वांसाठी आहेत!” मालकिण ओरडली. आणि हाच मुख्य मुद्दा आहे.”

त्या माणसाने नजर उचलून तिच्याकडे पाहिले. “सर्वांसाठी?” त्याने आश्चर्याने विचारले.

“होय,” मालकिणीने पुन्हा सांगितले. “सर्वांसाठी.”

त्या माणसाने काहीतरी बोलायचा प्रयत्न केला आणि तो पुन्हा गप्प झाला. क्षणभरासाठी त्याच्या डोळ्यांपुढे एक प्रकारचा प्रकाश चमकतो आहे असे त्याला जाणवले, जणूकाही त्याला सर्व समजले आहे. आणि मग तिथे पुन्हा काळोख पसरला. त्याच्या चेहऱ्यावर उदासीनता दाटली.

“ओह, पण तुम्ही मला ओळखत नाही. मला खात्री आहे की, इथे हजर असलेल्या लोकांसारखा मी नाही. खरोखरच, हे आंबे मिळण्याची पात्रता माझ्यात नाही. . . ”

अशा तऱ्हेने तो बोलतच राहिला, त्याच्या विचारांतील आणि संभाषणातील व्यग्रता आणि बेचैनी आणखीनच वाढत गेली. अखेर, त्या मालकिणीने त्याला तिथे थांबवण्याचे प्रयत्न करणे सोडून दिले; कारण इतरही पाहुणे होते ज्यांच्याकडे तिला लक्ष द्यायचे होते. गेटजवळ उभे राहून स्वतःशीच संवाद करत असलेल्या त्या माणसाला सोडून ती आत निघून गेली.

काही काळानंतर, आंब्यांच्या मोठ्या टोपल्या हातात काळजीपूर्वक धरून लोक आमराईतून बाहेर पडू लागले. त्यांना पाहून, तो माणूस विचारांच्या नकारात्मक वावटळीतून बाहेर आला असे वाटले.

“अरे — कुठे निघाला आहात तुम्ही?” त्याने त्या लोकांना विचारले.

“तुला ऐकायला आले नाही का?” त्यांच्यातील एकजण त्याला म्हणाला. “ही आमराई आता एका मिनिटातच बंद होणार आहे. तुला आंबा हवा असल्यास, पटकन जा! एक तरी आंबा तुला नक्कीच मिळेल.”

पण छे, तरीही, त्या माणसाने घाई केली नाही. त्याऐवजी त्याचा चेहरा आणखीनच पडला. “अरेरे. . . !” त्याने निःश्वास सोडला. “मी का इतका वेळ वाट पाहिली? इतका मूर्खपणा मी कसा करू शकतो? आता केवळ एकच मिनिट उरले आहे. . .”

आणि मग त्याने त्या आमराईच्या मालकिणीला स्वतःच्या दिशेने येताना पाहिले. “मला माफ करा, श्रीमान,” तो जिथे उभा होता तिथे आल्यावर ती सौम्यपणे म्हणाली. “मला आता आमराई बंद करायला हवी. तीन तास होऊन गेले आहेत.”

ती गेटपर्यंत पोहोचली आणि एकही शब्द न बोलता तो माणूस एक पाऊल मागे सरकला. ते लोखंडी गेट त्याच्यासमोर झुलले; त्याचे कुलुप बंद झाले. आकाशातील रंग गहिरे होत गेले, तो माणूस तिथेच उभा राहिला आणि त्याच्यापासून थोड्याच अंतरावर होते, ते आंबे.

© २०१९ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.